शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.२२/२०२२

श्रीमती शोभा विठ्ठल काळेबाग } तक्रार अर्जदार

विरूध्द्

१. श्री.आचार्यरत्न देशभूषन शिक्षण प्रसारक, मंडळ, कोल्हापूर.
२. महावीर महाविद्यालय, कोल्हापूर. } वि.प.

श्री.आचार्यरत्न देशभूषन शिक्षण प्रसारक, मंडळ, कोल्हापूर यांचे महावीर महाविद्यालय, कोल्हापूर यांचेकडील शिक्षिका श्रीमती शोभा विठ्ठल काळेबाग यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.०४/०७/२०२२ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

१. शिवाजी विद्यापीठाच्या अधिष्ठाता पदासाठी मी केलेल्या अर्जावर मा.प्राचार्यांनी सही केलेली नाही त्याचबरोबर तो अर्ज पुढील कार्यवाहीसाठी शिवाजी विद्यापीठाकडे पुढील कार्यवाहीसाठी कार्यालयामार्फेत पाठविला नाही.

२. कार्यालयामार्फत अर्ज सादर न झाल्यामुळे छाननी समितीने माझा अधिष्ठाता पदाचा अर्ज अपात्र केला आहे.

३. दुस-या वेळेस दि.२३/०२/२०२२ च्या विद्यापीठाच्या जाहिरातीनुसार मी मा.प्राचार्यांना भेटून पुनश्चः अर्ज सादर केला तथापी त्यावरही मा.प्राचार्यांनी सही केली नाही.

४. एकूण दोनवेळा माझ्या अर्जावर केवळ जाणीवपूर्वक सही न करता माझा अर्ज कार्यालयामार्फत शिवाजी विद्यापीठाकडे न पाठवल्यामुळे माझे शैक्षणिक नूकसान वारंवार माझे मानसिक खच्चीकरण केले जात आहे.

५. विभागप्रमुख पदासाठी जाणीवपुर्वक डावलले जात आहे.

**संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय :**

आमचे महाविद्यालयमध्ये बी.ए.बी.एड हा (एकात्मीक) अभ्यासक्रम सन १९८५ पासून सुरू आहे. श्रीमती डॉ.काळेबाग शोभा विठ्ठल या आमच्या महाविद्यालयामध्ये बी.ए.बी.एड (एकात्मीक) विभागाकडे शिक्षणशास्त्र विषयाकरीता पूर्णवेळ शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. बी.ए.बी.एड (एकात्मीक) विभागाकडे

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

एकूण २६ १/४ शिक्षकांची आवश्यकता असून पैकी २५ १/२ प्राध्यापक कार्यरत होते. सन २०१३ पासून या विभागातील ०८ शिक्षकांची पदे रिक्त झालेली आहेत.

बी.ए.बी.एड. विभागातील पदे रिक्त झालेली असून ती पदे भरणेकामी आमचेकडून २०१३ पासून वारंवार शासनाकडे ना-हरकत प्रमाणपत्राची मागणी करणेत आलेली आहे. परंतू बी.ए.बी.एड. विभागाकडील पद भरतीस बंदी असल्यामुळे आम्हांस शासनाकडून अद्यापही ना-हरकत प्रमाणपत्र मिळालेले नाही. त्यामुळे आम्हांस बी.ए.बी.एड. विभागाकडे कोणतीही नियमित शिक्षकांची नेमणूक करता आलेली नाही.

श्रीमती शोभा विठ्ठल काळेबाग या एक जेष्ठ प्राध्यापिका असून विद्यार्थ्यांचा शैक्षणिक हिताचा विचार करून त्याचा अर्ज पुढील कार्यवाहीसाठी पाठविलेला नाही. यामध्ये महाविद्यालय किंवा संस्थेचा त्यांना शैक्षणिक संधीपासून वंचित रहावे असा कोणताही हेतू नाही. केवळ संस्था, महाविद्यालय व विद्यार्थीहित या सर्व बाबींचा व्यापक विचार करून त्यांचा अर्ज पाठविलेला नाही. त्यांनी या संदर्भात वेळोवेळी केलेल्या अर्जास संस्थेने/प्राचार्यांनी त्यांना व विद्यापीठास लेखी पत्राव्द्वारे कळविले आहे.

डॉ.काळेबाग यांनी त्यांच्या महाविद्यालयातील सेवेच्या संदर्भात कोणतीही तक्रार केलेली नाही. त्यांनी आपला तक्रार अर्ज विद्यापीठातील अधिष्ठाता पदासाठी शिफारस न केलेबदद्लचा आहे. त्यामुळे दि महाराष्ट्र पब्लिक युनिव्हर्सिटी ॲक्ट, २०१६ नुसार (कलम ७९ पोटकलम) मधील कलम ६ नुसार त्यांनी केलेला तक्रार अर्ज हा कायदेशीररित्या लागू होत नाही. कारण महाविद्यालयातील सेवेच्या बाबतीत यासंदर्भात कोणतीही तक्रार नाही. तसेच एखाद्या प्राध्यापकास विद्यापीठातील पदावर जाणेस शिफारस करणे/न करणेचा अधिकार हा पुर्णतः संस्थेस/प्राचार्यांस आहे. त्यामुळे त्यांनी केलेली तक्रार विद्यापीठ कायद्यास अनुसरून नाही. तरी सदर तक्रार अर्जाबाबत ज्यावेळी समितीची बैठक आयोजित केली जाईल त्यावेळी संस्थेस/महाविद्यालयास म्हणणे मांडणेची संधी उपलब्ध करून देणेविषयी नम्र विनंती.

**समितीची निरीक्षणे :-**

१. दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकून घेता समितीच्या असे निर्देशनास आले की, संस्थेचे चेअरमन व महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी तक्रारदार यांचा अर्ज विद्यापीठाकडे अग्रेषित न करण्यामागे त्यांच्या महाविद्यालयात बी.ए. बी.एड. या अनुदानित विभागात जवळपास चारशे विद्यार्थी शिक्षण घेत आहोत. सन २०१३ पासून या विभागातील आठ शिक्षक सेवानिवृत्ती तसेच अन्य कारणाने कमी झाले आहेत. शासनाकडून शिक्षक भरती बंदी असल्याने व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून महाविद्यालयाकडून तक्रारदार यांचा अर्ज पुढील कार्यवाहीसाठी पुढे पाठविलेला नसल्याचे सांगितले. तसेच संस्था अध्यक्ष यांनी सदरची तक्रार तक्रार निवारण समितीसमोर चालणेस पात्र नाही, तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीचे स्वरूप महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम ७९ (७) सेवासंबधी (सर्व्हिस ग्रीव्हंन्स) 'वाद' असा होत नसलेने तक्रार अर्ज कायदेशीररित्या लागू होत नाही. तसेच

सदर बाब ही तक्रारदार यांचे सेवेशी निगडीत नाही. सबब ती समितीसमोर चालणेस पात्र नाही असे कथन केले.

सर्व बाबींचा विचार करून समितीची निरीक्षणे खालीलप्रमाणेः-

१. तक्रारदार यांनी दोन वेळेस विद्यापीठाकडे अधिष्ठाता पदाच्या जाहिरातीस अनुसरून अर्ज केला होता. तथापि महाविद्यालयाच्या प्राचार्यांमार्फत त्यांचा अर्ज पाठविला नसल्याच्या कारणावरून अधिष्ठाता पदासाठी विद्यापीठाकडून अपात्र केले गेले. त्यामुळे तक्रारदार यांना त्यांची शैक्षणिक प्रगतीमध्ये संस्था व महाविद्यालयाने अडवणूक केली आहे. तसेच त्यांना भविष्यातील संधी पासून वंचित ठेवले आहे.

२. प्राचार्य व महाविद्यालय यांनी दिलेल्या महाविद्यालयातील बी.ए.बी.एड. या विभागाबाबत दिलेले कारण या समितीस संयुक्तिक वाटत नाही आणि अर्ज अग्रेषित न करण्यामागे वैध कारण दिसून येत नाही.

३. संस्थेचे अध्यक्ष यांनी समितीच्या कार्यकक्षेबाबत उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम ७९(१) व (७) वाचले असता, तक्रार निवारण समितीसमोर सदरची तक्रार चालणेस पात्र असल्याचे या निष्कर्षापर्यंत समिती येते. अधिक स्पष्टतेसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम ७९(१) व (७) खालीलप्रमाणे आहे.

(१) प्रत्येक विद्यापीठामध्ये, राज्य शासन, केंद्र सरकार किंवा स्थानिक प्राधिकरण यांनी व्यवस्थापन केलेल्या व चालविलेल्या संस्थाव्यतिरिक्त, विद्यापीठाचे, संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे अध्यापक व इतर कर्मचारी यांच्या, राज्य शासन व त्यांचे अधिकारी यांच्या विरूध्दच्या तक्रारी व्यतिरिक्त, इतर सर्व प्रकारच्या आणि विद्यापीठाच्या व महाविद्यालय न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्रात येत नाहीत अशा तक्रारींवर कार्यवाही करण्यासाठी एक तक्रार निवारण समिती असेल.

(७) दोन्ही पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्रात नसलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवेसंबंधीची गाऱ्हाणी किंवा तक्रारी विचारार्थ स्वीकारणे व त्यावर निर्णय देणे हे तक्रार निवारण समितीसाठी कायदेशीर असेल.

उपरोक्त दोन्हीही कलम एकत्ररित्या वाचले असता, विद्यापीठाच्या व महाविद्यालय न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्रात येत नसलेल्या तक्रारी या समितीच्या कार्यकक्षेत येतील. तसेच तक्रारदार यांनी त्यांचा अर्ज अग्रेषित करीत नसल्याने महाविद्यालयाच्या प्राचार्यां विरूध्द् तक्रार केली असलेने सदर तक्रार नियुक्ती प्राधिकरणाविरूध्द् आहे. सद्यस्थितीत तक्रारदार या संस्था व महाविद्यालयाच्या सेवेमध्ये कार्यरत असलेने विद्यापीठाशी पत्रव्यवहार करताना त्यांना संस्थेकडून अर्ज अग्रेषित करून घेणे आवश्यक आहे. अर्जाकरिता आवश्यक असणाऱ्या बाबींमध्ये सदरची बाब आवश्यक आहे. सबब संस्था व महाविद्यालयाने त्यांचेकडे कार्यरत असणाऱ्या शिक्षकाच्या पुढील वाटचालीकरिता अडथळा करणे योग्य नव्हे.

तसेच तक्रारदार यांचा अर्ज संस्थेने अग्रेषित केला म्हणजे तक्रारदार यांची त्या पदाकरीता निवड झाली असा कोणताही अन्वयार्थ या प्रकरणी निघत नाही. व एखाद्या शिक्षक/कर्मचा-याने नोकरीत असताना वरिष्ठ पदासाठी स्पर्धा करणे अपेक्षित असते व संस्थेने देखील त्या शिक्षक/कर्मचा-यास प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. सबब तक्रादाराचा अर्ज संस्थेने अग्रेषित करणे क्रमप्राप्त व न्यायोचित आहे. तसेच केवळ अर्ज अग्रेषित झाला म्हणजे तक्रारदारास पद प्राप्त झाले असे नसून केवळ त्यांना स्पर्धेत भाग घेण्याची संधी प्राप्त होणार आहे.

यापूर्वीचे तक्रारदार यांचे दोन्ही अर्ज महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी त्यांचेमार्फत पाठविणेची कार्यवाही न केलेने तसेच दि.१९/०७/२०२२ रोजीच्या जाहिरातीसाठी करावयाच्या अर्जास ही नकार दिल्याने तक्रारदार यांनी या समितीकडे सदर प्रकरणी तात्काळ न्याय मागणी केली. तसेच विहित मुदतीत अर्ज सादर करावयाचा असलेने तक्रारदार यांची विनंती मान्य करून सदरचे प्रकरण समितीने सुनावणीस घेतले. शिक्षकाच्या हितार्थ विचार करून कार्यवाही करणे ही संस्था व महाविद्यालयाची जबाबदारी असताना संस्था व महाविद्यालय यांनी कोणत्याही कायदेशीर कारणाशिवाय अर्ज अग्रेषित न करणे ही कृती नियमास धरून नाही.

२. तक्रारदार यांनी तक्रार अर्जामध्ये विभागप्रमुख पदासाठी जाणीवपुर्वक डावलले जात आहे अशी तक्रार नमूद केली आहे. तथापि समितीने तकारदार यांना त्यांच्या अन्य तक्रारींबाबत विचारणा केली असता आपली कोणतीही अन्य तक्रार नसल्याचे कथन केले. सबब तक्रारदार यांची सदरची तक्रार समितीकडून विचारार्थ घेण्यात आली नाही.

**आदेश**

संस्था/महाविद्यालयाने तक्रारदार यांनी तक्रार अर्जामध्ये नमूद केलेनुसार त्यांचा आंतरविद्याशाखा पदाकरिता विद्यापीठाकडे करीत असलेला अर्ज प्राचार्यांमार्फत विहीत मुदतीत पाठविणेची कार्यवाही तात्काळ करावी.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधितांना देऊन तसे कळविण्यात यावे.

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती

**दिनांक :** 24|08|2022

Mahajan
**सदस्य**
**( डॉ.एस.एस.महाजन )**

**सदस्य**
**(डॉ. एन.बी.गायकवाड)**

**सदस्य**
**(श्री.ए.ए.कुलकर्णी)**

**सदस्य सचिव**
**(श्रीमती ए.ए. कदम)**

**अध्यक्ष**
**( श्री. एस.पी.कुलकर्णी )**